आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२३ डिसेंबर २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्राची सुरक्षा आणि अखंडता सुनिश्चित करण्यात भारतीय गुप्तवार्ता विभागाची भूमिका महत्त्वाची असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

- विकसित भारत जी रामजी योजनेसाठी एक लाख ५१ हजार कोटी रुपये तरतूद

- रबी हंगामात ५ कोटी ८० लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर पेरणी / गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे आठ लाख हेक्टरने वाढ

- एलव्हीएम थ्री-एम ६ उपग्रह वाहकाच्या उड्डाणाची उलटगणती सुरु

- महाराष्ट्रातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया सुरु

**आणि**

- मुंबई विमानतळावर ४८ कोटी रुपये किमतीचे अंमली पदार्थ जप्त

**<><><><><>**

इंटेलिजन्स ब्यूरो - आय बी म्हणजे भारतीय गुप्तवार्ता विभाग देशातल्या नागरिकांची सुरक्षा आणि राष्ट्राची एकता आणि अखंडता सुनिश्चित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. भारतीय गुप्तवार्ता विभागाच्या नवी दिल्लीत झालेल्या ३८ व्या शताब्दीस्मृती व्याख्यानात त्या बोलत होत्या. गुप्तवार्ता विभाग एक अदृश्य नायकांची संस्था असून गेल्या दशकात अशा सुरक्षा यंत्रणांनी देशातले अनेक धोके निष्प्रभ केले आहेत, असंही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यावेळी म्हणाल्या.....

**होल्ड - बाईट राष्ट्रपती** (२० सेकंद)

यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, गृहराज्यमंत्री बंडी संजय कुमार आणि गृहसचिव गोविंद मोहन उपस्थित होते.

**<><><><>**

विकसित भारत जी रामजी योजनेसाठी एक लाख ५१ हजार कोटी रुपये तरतूद केली असल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी आज दिली. चौहान यांनी एका व्हिडिओ संदेशात सांगितलंय की, आता १०० दिवसांऐवजी सव्वाशे दिवसांच्या रोजगाराची हमी ग्रामीण भागत सरकारने दिली आहे. मनरेगा या पूर्वीच्या योजनेच्या नावाखाली नवीन योजनेची जाणीवपूर्वक बदनामी केली जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

देशात यावर्षी आतापर्यंत ५ कोटी  ८० लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर रब्बी पिकांची पेरणी झाली आहे. गेल्या वर्षी याच कालावधी झालेल्या पेरण्यांच्या तुलनेत हे क्षेत्र  सुमारे आठ लाख हेक्टरने जास्त आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं १९ डिसेंबरपर्यंतच्या रब्बी पिकांखालील क्षेत्राच्या प्रगतीचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. गव्हाचं क्षेत्र ३०१ लाख हेक्टरपेक्षा जास्त आहे. तर भाताखालचं क्षेत्र १३ लाख हेक्टरनं  वाढलं  आहे, कडधान्याची पेरणी १२६ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर झाली असल्याचं सरकारी आकडेवारीत म्हटलं आहे.

**<><><><>**

शेतकरी नेते आणि माजी प्राधनमंत्री दिवंगत चौधरी चरणसिंह यांच्या जयंतीनिमित्त आज राष्ट्रीय शेतकरी दिवस साजरा केला जात आहे. शेतकरी, ग्रामीण विकास आणि कृषी सुधारणांसाठी चरणसिंह यांनी आयुष्यभर समर्पित भावनेनं कार्य केलं. अन्नसुरक्षा आणि ग्रामीण विकासासाठी अखंड परिश्रम करणाऱ्या शेतकऱ्यांच्या योगदानाला अभिवादन करण्यासाठी **या** उद्धेशानं २००१ पासून राष्ट्रीय शेतकरी दिवस साजरा केला जातो. आज देशभरात त्यानिमित्त विविध कार्यक्रम होत आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी चरणसिंह यांना जयंतीनिमित्त श्रद्धांजली वाहिली आहे.

<><><><><>

माजी प्रधानमंत्री पी.व्ही. नरसिंह राव यांची आज पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी  आदरांजली वाहिली. नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली भारताने केलेल्या आर्थिक सुधारणांमुळे देशाच्या विकासाचा मजबूत पाया रचला गेला, असं खरगे यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

<><><><><>

अमेरिकेचा अत्याधुनिक दूरसंचार उपग्रह अंतराळात घेऊन जाणारा एलव्हीएम थ्री-एम ६ अग्निबाणाचं उड्डाण उद्या होणार असून यासाठीच्या उलट गणतीला सुरुवात झाल्याची माहिती इस्त्रोनं आज दिली. श्रीहरिकोटा इथल्या तळावरुन ब्लूबर्ड ब्लॉक- २ हे अंतराळयान घेऊन हे रॉकेट उद्या सकाळी ८ वाजून ५४ मिनिटांनी उड्डाण करेल. अमेरिकेचा हा उपग्रह ६ टनांपेक्षा जास्त वजनाचा असून अशा प्रकराच्या अग्निबाणावरून आतापर्यंत सोडण्यात आलेला सगळ्यात वजनदार उपग्रह असल्याची माहिती इस्त्रोनं दिली आहे.

<><><><><>

युरोपीय महासंघानं रशियावर घातलेल्या   आर्थिक निर्बंधांची मुदत आणखी सहा महिन्यांनी वाढवली आहे. रशियावर व्यापार, वित्त, तंत्रज्ञान, ग्राहकोपयोगी उत्पादनं इत्यादी क्षेत्रात २०१४ पासून हे निर्बंध युरोपीय महासंघानं घातले आहेत.

दरम्यान अमेरिकेच्या नेतृत्वाखाल च्या चर्चेसोबतच रशियाबरोबर थेट चर्चा करण्याचा प्रयत्नही महासंघ करत आहे.

<><><><><>

बांग्लादेशातल्या परिस्थितीवर भारत सरकार बारीक लक्ष ठेवून आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं आज सांगितलं. अल्पसंख्यकांवर हल्ले होत असल्याबद्दल मंत्रालयानं चिंता व्यक्त केली असून दास यांच्या हत्येला जबाबदार असणाऱ्यांवर त्वरित कारवाई करण्याची मागणी केली आहे. बांग्लादेशात हिंदूंवर हल्ले होत असल्याच्या मुद्द्यावरून विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलातर्फे आज नवी दिल्लीतल्या बांगलादेश उच्चायुक्त कार्यालयाबाहेर निदर्शनं करण्यात आली. आज सकाळपासूनच या परिसरातला पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया आजपासून सुरु झाली. याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड... व्हीसी-(५० सेकंद)**

*(या निवडणुकीसाठी ३० डिसेंबरपर्यंत अर्ज स्वीकारले जातील आणि ३१ डिसेंबरला अर्जांची छाननी होईल. २ जानेवारी २०२६ पर्यंत उमेदवारांना माघार घेता येईल. ३ जानेवारीला निवडणूक चिह्नांचं वाटप होईल आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध होईल. आवश्यकतेनुसार १५ जानेवारीला मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होईल. १९ जानेवारीला निवडणूक निकाल शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केल्यानंतर निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईल.*

*या निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडीच्या घटक पक्षांची समीकरणं अद्याप जाहीर झालेली नाहीत.*

*मुंबईत काँग्रेसनं सर्व जागा स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या दोन्ही पक्षांनी मुंबईत एकत्र लढायचं ठरवलं असलं तरी अद्याप जागावाटप जाहीर झालेलं नाही. यावेळी आम आदमी पक्षानं रिंगणात प्रवेश केला असून ४० उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे.)*

**<><><><><>**

ज्येष्ठ पोलीस अधिकारी सदानंद दाते यांना महाराष्ट्रात परत पाठवण्याला केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीनं मंजुरी दिली आहे. राष्ट्रीय तपास संस्थेचे

प्रमुख म्हणून ते कार्यरत होते. राज्याचे पोलीस महासंचालक म्हणून त्यांची नियुक्ती होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विद्यमान पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांचा कार्यकाळ ३१ डिसेंबर रोजी पूर्ण होणार आहे.

**<><><><>**

सीमाशुल्क विभागाने मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर ४८ कोटी रुपये किमतीचे अंमली पदार्थ जप्त केले आहेत. १८ ते २२ डिसेंबर दरम्यान केलेल्या कारवाईत सीमाशुल्क विभागाच्या पथकाने बँकॉकहून आलेल्या आठ प्रवाशांकडून ४८ किलोपेक्षा जास्त हायड्रोपोनिक वीड हा अंमली पदार्थ जप्त केला. मस्कतहून आलेल्या एका प्रवाशाकडून १६ लाख रुपये पेक्षा जास्त किमतीचं ८१ ग्रॅम ॲम्फेटामाइन जप्त करण्यात आलं. तसंच या कारवाईदरम्यान ३५ लाख रुपयांपेक्षा पेक्षा जास्त किमतीचे २८३ ग्रॅम वजनाचे हिऱ्यांचे दागिने आणि २४ लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीचे साडे सहा किलो पॉलिश केलेले मौल्यवान खडे देखील जप्त करण्यात आले आहेत.

**<><><><>**

महिला क्रिकेटमध्ये, भारत विरुद्ध श्रीलंका पाच सामन्यांच्या टी- ट्वेंटी मालिकेतला दुसरा सामना आज विशाखापट्टणम इथल्या डॉ. वाय.एस. राजशेखर रेड्डी एसीए-व्हीडीसीए मैदानावर होणार आहे. सामना संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल.

**//<><><><><>//**